संक्षिप्त फौजदारी केस **क्र. १४३/२०१७**

**नि.क्र.४४**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ चा जबाब</u>**

साक्षीदाराचे नावः– **व्यंकट आनंत कुलकर्णी,**

वयः– ४३ वर्षे, व्यवसायः– शेती**,**

राहणारः– हासोरी**, ता. निलंगा जिल्हा लातूर.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकरी विधीज्ञ श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचेमार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** दुपारी २.०० च्या सुमारास मी माझ्या शेताकडे चालत्रो होतो. वाटेत मला फिर्यादी सतीश देशमाने पडलेले दिसले. ते बेशुध्द होते. त्यांच्या शेजारी मोटारसायकल पडली होती. बालाजी जाधव यांना मी आवाज दिला. त्यानंतर बालाजी जाधव आले. गाव जवळ असल्याने गावातील लोक देखील जमा झाले. आम्ही त्याला कासारसिरसी येथील डॉक्टर लोखंडे यांच्या दवाखान्यात नेले होते. सतीशला डोक्याला मार लागला होता. मोटारसायकलचे लाईट तुटून नुकसान झाले होते.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे अ◌ॅड एम.के.वलांडे यांच्यामार्फत सुरुः–</u>**

०२. तो अपघात कसा झाला हे मला माहीत नाही. बालाजी जाधव यांना मी आवाज दिला असे पोलीसांना सांगितले नव्हते.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.06.09 17:46:21 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

दिनांक ०९/०६/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

निलंगा